# महाप्रसाद

## कुंती गिरॉन

तो ऑक्टोबर १९८१च्या पानझडीच्या मोसमातील दिवस होता; सर्वत्र सूर्यप्रकाश पसरलेला होता. श्री नित्यानंद आश्रम येथील [जो आता श्री मुक्तानंद आश्रम या नावाने ओळखला जातो] सर्व आश्रमवासी आणि व्हिजिटींग सेवाकर्ते खालील लॉबीमध्ये एकत्र जमले होते. दुसऱ्याच दिवशी बाबा गुरुदेव सिद्धपीठाकडे प्रस्थान करणार होते. तो बाबांच्या तिसऱ्या विश्वयात्रेचा समापनाचा दिवस होता.

बाबा त्यांच्या निवासस्थानातून बाहेर आले आणि खालील लॉबीमधील त्यांच्या आसनावर स्थानापन्न झाले. आम्ही सर्वजण त्यांच्या सभोवती जमिनीवर बसलो; संपूर्ण जागा भरली होती. बाबा भारतात परतल्यानंतर जे सेवाकर्ते श्री नित्यानंद आश्रमात राहून सेवा अर्पण करणार होते त्या सर्वांशी बाबा निरोपाचे काही शब्द बोलले.

बाबा जे-जे शब्द बोलत होते, ते मी अतिशय लक्षपूर्वक ऐकत होते आणि माझ्या अंतरी पूर्णपणे ग्रहण करत होते. एका क्षणी बाबा थांबले आणि त्यांनी सभोवार दृष्टी फिरवली—त्यांनी भिंतींकडे पाहिले, छताकडे पाहिले आणि खिडकीतून बाहेर बगिच्याकडे पाहिले.

बाबा म्हणाले, “मला हे सर्व कधीच नको होते. माझी फक्त एवढीच इच्छा होती की, आपल्या आंब्याच्या वृक्षाखाली बसून भगवद्भजन करावे. हे सर्व केवळ माझ्या बाबांमुळे घडले आहे. मी माझ्या गुरुदेवांच्या आज्ञेचे पालन केले आणि हे सर्व घडून आले.”

बाबांना असे म्हणताना मी जेव्हा ऐकले, तेव्हा माझे हृदय अत्यंत हेलावून गेले. त्यांच्या शब्दांनी मला एक गहन समज प्रदान केली की, शक्तिपाताचा तसेच सिद्धयोगाच्या शिकवणींचा महाप्रसाद जगभरातील जिज्ञासूंपर्यंत पोहोचावा यासाठी बाबांनी त्यांच्या जीवनात खूप काही केले होते.

बाबांचे त्यांच्या श्रीगुरूंप्रति असलेले प्रेम आणि त्यांनी त्यांच्या श्रीगुरूंचे केलेले आज्ञापालन यांमुळेच मी व इतर हजारो जिज्ञासू—वर्तमान काळातील आणि आगामी काळातील जिज्ञासूदेखील—सिद्धयोग गुरूंचा कृपाप्रसाद आणि त्यांचे आशीर्वाद प्राप्त करू शकत आहोत. त्या दिवशी बाबांनी लॉबीमध्ये

आम्हाला त्यांच्या श्रीगुरूंच्या आज्ञापालनाच्या फलस्वरूप झालेल्या कल्याणकारी निष्पत्तीबद्दल जेव्हा सांगितले, तो क्षण अतिशय अनमोल होता.

बाबांनी आपले संपूर्ण जीवन त्यांच्या श्रीगुरुदेवांच्या आणि समस्त मानवतेच्या सेवेप्रति अर्पण केले, यासाठी मी सदैव त्यांच्याप्रति कृतज्ञ राहीन.

© २०२२ एस. वाय. डी. ए. फाउंडेशन®. सर्वाधिकार सुरक्षित.